# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २६ जुलै २०१९

### उपराष्ट्रपतींच्या हस्ते आज
### लोकशाही पुरस्कारांचे वितरण

मुंबई, दि. २६ (रानिआ): राज्य निवडणूक आयोगातर्फे देण्यात येणारे पहिले 'लोकशाही पुरस्कार' उद्या (ता. २७) उपराष्ट्रपती एम. वेंकैया नायडू यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, मुंबईतील हॉटेल आयटीसी मराठामध्ये सकाळी १० वाजता हा समारंभ होईल. सन २०१६ आणि २०१७ या कालावधीत पार पडलेल्या नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात पुढाकार घेतल्याबद्दल विविध संस्था आणि व्यक्तींना हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी वेगवेगळ्या सहा गटात एकूण १४ पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)